॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १४ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे जवळपास सर्व निकाल वेळेवर जाहीर झाले असून कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी प्राध्यापकांना पत्राव्दारे उत्तरपत्रिका मूल्यमापनाच्या आवाहनाला सर्वांनी सकारात्मक प्रतिसाद देवून सहभाग घेतल्यामूळे निकाल वेळेवर जाहीर करता आले. याबद्दल आनंद व्यक्त केला आहे.

प्रा. माहेश्वरी यांनी नवीन शैक्षणि वर्ष सुरू होत असल्यामूळे प्राध्यापकांना हे पत्र लिहीले आहे. या पत्राव्दारे सर्वांचे सहकार्य व सहभागामूळे मूल्यमापनाचे कामकाज व्यवस्थित पार पडले आणि निकाल वेळेवर जाहीर करता आले. जबाबदारीच्या भावनेतून प्राध्यापकांनी केलेली कृती या पूढच्या काळात ही सातत्याने प्रत्ययास येईल असा विश्वास व्यक्त केला आहे. निकालाची टक्केवारी अत्यंत कमी आहे. शिवाय कॉपीचे प्रमाण वाढले आहे. या चिंताजनक बाबी आहेत. निकालाची टक्केवारी समाधानकारक असावी याकरीता महाविद्यालयाच्या स्तरावर विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे. वर्गातील विद्यार्थ्यांची उपस्थिती कशी वाढेल, अध्ययन प्रक्रियेतील त्यांचा सहभाग अधिक कृतीशील कसा होईल, त्यासाठी आपले अभ्यासक्रमांचे स्वरूप रोजगाराभिमूख कसे करता येईल. याबाबत तातडीने पावले उचलाल अशी आशा आहे. युवापिढीचा कल लक्षात घेवून शिक्षणाच्या पारंपरिक साच्यात न अडकता नव्या आव्हानांना कुशलतेने आणि व्यावहारिकतेने सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांना तयार करावे लागेल असे म्हटले आहे.

खान्देशाच्या खेडयापाड्यातील उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आलेल्या युवापिढीच्या भवितव्याला आकार देण्यासाठी नवीन शैक्षणिक वर्षात आपण सगळे नवीन ऊर्जा घेवून सज्ज होवूयात असा आशावाद कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी या पत्रात व्यक्त केला आहे.

**बातमी क्रमांक २**

जळगाव दि. १४ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा नामविस्तार दिन ११ ऑगस्ट रोजी असून त्यानिमित्त राष्ट्रीय सेवा योजनेचे एकक असलेल्या महाविद्यालयांनी कमीत कमी ७५ भारतीय प्रजातीच्या वृक्षांची लागवड करून हरित परिसर ही संकल्पना राबवावी असे आवाहन कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी केले आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून प्रत्येक महाविद्यालयांत नैसर्गिक ऑक्सीजन पार्क तयार होईल यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहेत. वृक्ष लागवडीमूळे निसर्ग संर्वधन ही पृथ्वीच्या नैसर्गिक संसाधनाचे संरक्षण करते. वृक्ष वाढीमूळे निसर्गावर चांगला परिणाम होवून भरपूर पाऊस पडतो. सध्या वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात झाडे लावण्याची गरज असून महाविद्यालयांनी विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित्त आपल्या परिसरात कमीत कमी ७५ किंवा त्यापेक्षा अधिक भारतीय प्रजातीचे वृक्ष लागवड करून नामविस्तार दिन साजरा करावा आणि या कामी राष्ट्रीय सेवा योजना विभागाने पुढाकार घ्यावा असे आवाहन कुलगुरु प्रा. माहेश्वरी यांनी केले आहे.

---

जा.क्र.: कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: १४ जुलै, २०२३

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी